**विद्यापीठ अनुदान आयोगाची दि.२३ सप्टेंबर, २००९ ची अधिसूचना राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यालयांना लागू करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
ासन निर्णय क्र विअआ- २००९/(४३८/०९)/विशि-३
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ३० जानेवारी, २०१०

वाचा:-

१) विद्यापीठ अनुदान आयोगाचे सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंना पाठविलेले पत्र क्रमांक F.No. 1-1/2002 (PS) Pt file-III दि. २७ ऑगस्ट २००९.

२) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्रमांक F.3-1/2009 (PS) दि. २३ सप्टेंबर, २००९.

**प्रस्तावना :** देशातील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठातील तसेच महाविद्यालयातील शिक्षकांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने यापूर्वी वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनांनुसार तसेच दि.१ जून, २००९ च्या अधिसूचनेनुसार किमान शैक्षणिक अर्हता निश्चित केली आहे. सदर अधिसूचनेनुसार विद्यापीठ तसेच संलग्नित महाविद्यालये / संस्था यामधील अधिव्याख्याता सहाय्यक प्राध्यापक यांना नेट / सेट परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य करण्यांत आले आहे.

२. सध्या जे बिगर नेट / सेट अध्यापक तदर्थ स्वरुपात कार्यरत आहेत त्यांना दोन वर्षात चार संधीत नेट / सेट परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असल्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाने सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंना संदर्भाधीन अनुक्रमांक १ येथील दि.२७.८.२००९ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्याचा पुनरुच्चार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.२३.९.२००९ च्या अधिसूचनेमध्ये करण्यात आलेला आहे. त्यानुसार आवश्यक ते आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** राज्यातील विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालये / संस्था यामधील बिगर नेट / सेट अधिव्याख्यात्यांच्या / सहाय्यक प्राध्यापकांच्या बाबतीत शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**(i)** विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालये / संस्था यामधील शिक्षकांना नेट / सेट परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.

**(ii)** सध्या जे बिगर नेट / सेट अधिव्याख्याते तदर्थ, इ. स्वरुपात कार्यरत आहेत त्यांनी दि.३१.१२.२०११ पर्यन्त या दोन वर्षाच्या कालावधीतील प्राप्त होणाऱ्या चार संधीत नेट / सेट परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे.

**(iii)** सदर विहीत मुदतीत तदर्थ, इ.स्वरुपात कार्यरत असलेल्या अध्यापकांची पदे नियमित स्वरुपात भरण्यात येऊ नयेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.govt.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यांचा संकेताक क्रमांक २०१००१३०१४१४१४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

(रा.गो.जांधव)
उपसचिव, महाराष्ट्र शासन